जावक क्र. २०५
दि. ३१/५/०७



**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौ. सो. ए-वॉर्ड, वाशी रोड,
कोल्हापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रतिनिधी
कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी
श्री. एम.जी. अडसुळे

जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री. शरद गोसावी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. सदाशिव दत्तात्रय निकम<br>टॅक्निकल हौ. सो. ए-वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर, तर्फे प्रतिनिधी कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, श्री. एम.जी. अडसुळे<br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>शिक्षणाधिकारी, (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री. शरद गोसावी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांनी अपील क्र. २३ व २४ मध्ये दि. ३१.१०.२००५ रोजी दिलेल्या निकाला संदर्भात<br>अ. श्री.एस.एस.यादव, लघुटंकलेखक यांनी रु.२०००/- दंडाची रक्कम कोषागारात भरणा केली आहे. त्यानुसार त्यांचे सेवापुस्तकात घेतलेल्या नोंदीच्या पानांची साक्षांकीत प्रत<br>ब. उपरोक्त (अ) मधील दंडाची रक्कम शासन जमा करणेबाबत माध्यमिक शिक्षण विीागाने काढलेल्या आदेशाची व टिप्पणीची साक्षांकीत झेरॉक्स प्रत<br>क. निकाल पत्रातील मुद्दा क्र.२ नुसार झाले आदेशानुसार दि. १.४.२००४ ते |

| | | |
|---|---|---|
| | | २०.६.२००५ कालावधीतील नियंत्रण नोंदवहीची साक्षांकीत झेरॉक्स प्रत<br>ड. उपरोक्त (क प्रकारे ) नियंत्रण नोंदवही तयार केली नसेल तर त्याबाबत संबंधित जबाबदार कर्मचा-यावर केलेल्या कार्यवाहीची सांक्षाकीत झेरॉक्स प्रत<br>इ. श्री. आर.टी. गुरव, वरिष्ठ सहाय्यक यांनी रु. २०००/- दंडाची रक्कम कोषागारात भरणा केली आहे. सदर प्रकरणी अपिलेट प्राधिकरणाचे आदेशास अनुसरुन माध्यमिक शिक्षण विभागाने काढलेल्या आदेशाची व टिप्पणीची (दंड भरणेबाबतची ) सांक्षाकीत झेरॉक्स प्रत |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अपुरी, विलंबाने दिली, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. विकास देशमुख यांनी कायद्यानुसार नियोजित मुदतीत सुनावणी केली नाही, या कारणास्तव श्री. निकम यांनी दि. १०.५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. निकम यांनी मागितलेली मुद्दा क्र.अ व इ बाबतची माहिती त्यांना देण्यात आली नाही. याचे कारण अ. लघुटंकलेखक श्री. एस.एस. यादव यांना झालेल्या दंडाबाबतची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात आली नाही, त्यामुळे त्याची सांक्षाकित प्रत दिली नाही. 'मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दि. ३१.१०.२००५ रोजी दिलेल्या निकालामध्ये सूचना नसलेमुळे व तशी तरतूद नसलेमुळे श्री. यादव यांच्या सेवा पुस्तकात दंडाबाबतची नोंद घेणेत आलेली नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी दि. २७.१.२००६ रोजी दिलेल्या उत्तरात म्हटले आहे. वस्तुतः एखाद्या सरकारी कर्मचा-याला होणारी शिक्षा अथवा मिळणारे बक्षीस याची नोंद सेवापुस्तकात केली जाते, परंतु श्री. यादव यांच्या बाबतीत तसे का केले गेले नाही, हे जन माहिती अधिकारी सुनावणीत स्पष्ट करु शकले नाहीत. तशी नोंद करण्याचे त्यांनी मान्य केले. श्री. यादव

यांना, तसेच अन्य संदर्भात श्री. आ.टी.गुरव यांना केलेला दंड एकत्रितपणे वसूल करण्याचे आदेश दि. ३१.१०.२००५ च्या अपिलीय प्राधिका-यांच्या निकालात असल्याचे श्री. निकम यांनी नमूद केले आहे व त्यानुसार कार्यवाही न करता एकाच कर्मचा-याकडून वसुली का केली गेली, याबाबतची माहिती मागितली आहे.

श्री. एस.एस. यादव व वरिष्ठ सहाय्यक श्री. आर.टी. गुरव या दोघांकडूनही दोन वेगवेगळ्या संदर्भात प्रत्येकी रु. २०००/- दंड जमा करुन घेण्यात आला आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ कलम १२ (२) (ख) नुसार श्री. यादव यांना रु. २०००/- दंड अपिलीय प्राधिका-यांनी सुनावला आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ अन्वये दंडाचा अधिकार प्रथम अपिलीय प्राधिका-यांना नाही, यासाठी राज्य माहिती आयोग सक्षम आहे. परंतु तत्कालीन नियमानुसार ही कारवाई केली आहे. दोन्हीही संदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी 'जन माहिती अधिकारी व त्यांचे कार्यालयातील या बाबींशी संबंधित कर्मचा-यांकडून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२, कलम १२(२)(ख) नुसार एकत्रित दंडाची रक्कम रु. २०००/- वसूल करणेत यावी,' असे स्पष्टपणे नमूद केले आहे. असे असताना श्री. यादव व श्री. गुरव या दोघांकडूनच ही रक्कम संबंधित अधिका-यांनी भरुन घेतलेली आहे. तरीही माहिती अधिका-यांनी आपल्या उत्तरात मात्र 'दंडात्मक कारवाई संबंधित कर्मचा-यांवर केली' असल्याचे म्हटले आहे. मुळात हे विधान दिशाभूल करणारे आहे. तसेच त्यावर आधारित मुद्दा क्र. ब चे पुढील उत्तरही अयोग्य आहे. ' दंडात्मक कारवाई संबंधित कर्मचारी यांचेवर केलेली असलेने या बाबत माध्यमिक शिक्षण विभागाने स्वतंत्र आदेश काढलेले नाही', असे त्यांनी म्हटले आहे.

अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार अंमलबजावणी न करता झालेला बदल का व कोणी केला, याची माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्याला दिली नाही व अपिलीय प्राधिका-यांनीही त्यांच्या दि. ३.४.२००६ च्या निकालपत्रात या महत्वाच्या बारकाव्याची दखल घेतली नाही. वरील मुद्दा क्र. क अन्वये नियंत्रण नोंदवहीबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दिलेली आहे. त्यामुळे मुद्दा क्र. ड आपोआप निरस्त होतो.

श्री. निकम यांनी दि. ३१.१.२००६ रोजी माहितीसाठी आवश्यक ते रु. १४४/- अतिरिक्त शुल्क भरले. परंतु ही रक्कम भरल्याची पावती दि. ३.२.२००६ ची मिळाली. अनेक वेळा गेल्यानंतर प्रत्यक्ष माहिती दि. ७.२.२००६ रोजी मिळाली, असे श्री. निकम यांनी त्यांच्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबतही त्यांनी त्यांचा आक्षेप स्पष्टपणे नमूद केला आहे. सुनावणीचे पत्र उशिरा मिळणे, प्रत्यक्ष तारखेला अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसणे आणि अपिलीय प्राधिकारी गैरहजर असताना अपीलकर्ता गैरहजर असल्याचे नमूद करणे असे आक्षेप श्री. निकम यांनी नोंदविले आहेत. उपस्थित उत्तरवादी याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

वरील सर्व बाबी लक्षात घेता मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना रु. ३०००/- दंड करण्यात येत आहे. माहे जुन २००७ च्या त्यांच्या वेतनातून ही रक्कम कापून घेण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी याची पूर्तता करुन आयोगाला पूर्तता अहवाल पाठवावा.

३. वरील दंडाची जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या सेवापुस्तकात नोंद घ्यावी.

४. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. विकास देशमुख यांनी अपिलाची सुनावणी माहितीचा अधिकार कायद्यानुसार बंधनकारक असलेल्या मुदतीतच केली पाहिजे. अर्जदाराला त्याची पुरेशी सूचना देऊन सुनावणीची पक्रिया योग्य प्रकारे पार पाडली पाहिजे, याची समज देण्यात येत आहे.

५. श्री. यादव व श्री. गुरव यांच्याकडून दंडाची पूर्ण रक्कम वसूल न करता अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. विकास देशमुख यांच्या दि. ३१.१०.२००६ च्या आदेशाप्रमाणे इतर संबंधित कर्मचा-यांकडून त्यातील योग्य तो वाटा वसूल करावा. ती रक्कम श्री. यादव व श्री. गुरव यांना अदा करावी, आणि श्री. यादव व श्री.

गुरव यांच्यासह सर्व संबंधितांच्या सेवापुस्तकात त्याची नोंद करावी. या सर्वांची पूर्तता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दि. १५.७.२००७ पर्यंत करुन आयोगाला पूर्तता अहवाल पाठवावा.

( विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ३१.५.२००७.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

जावक क्र. 187/07
दि. 25/5/07

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. महमंद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
सातारा — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/५/२००७ |
| ३ | ~~[illegible]~~ संबंधित | **अपीलकर्ता** श्री. महमंद बाबालाल मुल्ला, ३८, लक्ष्मीनगर, एम.आय. डी.सी.सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.७.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | एमटीएल-६०६१ या वाहनाची मालकी व हस्तांतर याबाबतचा तपशील |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. महमंद बाबालाल मुल्ला यांनी मोटार वाहन क्र. एमटीएल-६०६१ हे दि ९.९.२००४ रोजी कोणाच्या नावावर होते व विशेष वसुली अधिकारी, जनता सहकारी बँक लि., साता यांच्या नावे किती तारखेला हस्तांतरीत झाले, अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सातारा यांच्याकडे दि. ८.४.२००६ रोजी अपील केले. परंतु अपिलीय प्राधिका-यांनी अपिलाची दखल घेतली नाही, या कारणावरुन त्यांनी दि. १८.५.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. प्रथम अपील प्राप्त झाल्याचे दप्तरी नोंदीवरुन निदर्शनास आले नाही, म्हणून त्याची दखल घेतली गेली नाही, असे अपिलीय प्राधिका-यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. या अपिलाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांनी दि. १२.६.२००६ रोजी सादर केल्यानंतर त्वरित अपिलाची सुनावणी केली. त्यामुळे त्यांच्या शंकेचे पूर्णपणे निरसन झाले, असे अपिलीय प्राधिका-यांनी या निवेदनात नमूद केले आहे. अपीलकर्ता श्री. महंमद बाबालाल मुल्ला यांनी त्याला दुजोरा देणारे स्वतंत्र निवेदन सादर करुन अपील निकालात काढण्याची विनंती केली आहे.

## आदेश

अपीलकर्त्याची तक्रार राहिली नसल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २८.५.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**राज्य माहिती आयुक्त कार्यालय,**
**पुणे विभाग, पुणे**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौन्सिलहॉल समोर,**
**पुणे ४११ ००१**

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील,
'शितल', दामाणी हायस्कूलचे पूर्वेस,
चांदणी चौक, शिवाजीनगर, सांगली .. अपीलकर्ता

विरुध्द

१. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र.सांगली १,२,३,४,५,६,७,८, ९,१०,११,१२,३२

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — अपील क्र. ११३

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र. सांगली ११४

.. उत्तरवादी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगली हायस्कूल, सांगली — अपील क्र.सांगली १,२,३,४,५,६,७, ८,९,१०, ११,१२

जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — अपील क्र. सांगली ११३

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र. सांगली ११४

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**राज्य माहिती आयुक्त कार्यालय,**
**पुणे विभाग, पुणे**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौन्सिलहॉल समोर,**
**पुणे ४११ ००१**

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील,
'शितल', दामाणी हायस्कूलचे पूर्वेस,
चांदणी चौक, शिवाजीनगर, सांगली .. अपीलकर्ता

विरुध्द

१. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र.सांगली १,२,३,४,५,६,७,८, ९,१०,११,१२,३२

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — अपील क्र. ११३

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र. सांगली ११४

.. उत्तरवादी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगली हायस्कूल, सांगली — अपील क्र.सांगली १,२,३,४,५,६,७, ८,९,१०, ११,१२

जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — अपील क्र. सांगली ११३

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली — अपील क्र. सांगली ११४

# विवेचन

अपीलकर्ता डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सांगली हायस्कूल, सांगली, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली, जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे सांगली हायस्कूलच्या संदर्भात विविध प्रकारची माहिती मागणारे अर्ज केले होते. त्या अर्जांना जनमाहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद, सांगली, अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे त्यांनी अपिले दाखल केली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द डॉ. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.७.२००६ रोजी केलेली १३ अपिले ( दाखल दि. १८.७.२००६ ) व दि. २४.४.२००६ रोजी केलेली २ अपिले ( दाखल दि. २७.४.२००६ ) अशा एकूण १५ अपिलांची सुनावणी दि. १७.४.२००७ रोजी घेण्यात आली.

सुनावणीसाठी उभय बाजूंतर्फे पुढील व्यक्ती उपस्थित होत्या :

१) अपीलकर्ता डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील

२) जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. ए.ए.ढोले, सांगली हायस्कूल, सांगली

२) अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री. बी. पी. कांबळे यांचे प्रतिनिधी श्री. एच.एस. नांगरे पाटील, जिल्हा परिषद, सांगली

३) जन माहिती अधिकारी तथा शिक्षण सहसंचालक श्री. व्ही.बी.पायमल

५) अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक श्री. एस.के.जाधव

संबंधित अपिलांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

( पृष्ठ क्र. ३ ते १६ )

अपील क्रमांक : १०२ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १.४.१९८५ ते दि. १२.१२.२००५ या काळात महाराष्ट्र शासनाकडून मिळालेल्या अनुदानाची वर्षनिहाय रक्कम २) रक्कम कशासाठी खर्च करावी या बाबतचे शासन आदेशाची छायांकित प्रत व त्यानुसार खर्च केला असल्यास वर्षनिहाय तपशील ३) वेतनेतर अनुदान मिळालेल्या, न मिळालेल्या, तसेच एकदाच एकत्रित मिळाल्याचा तपशील | मुख्याध्यापकांनी वरील माहिती दिली. त्यात काही ठिकाणी कोऱ्या जागा सोडल्या आहेत. खर्चाचा वर्षानिहाय तपशील दिलेला नाही. तसा तो संपूर्ण देणेही मर्यादित कालावधीत शक्य नाही. कोऱ्या जागा म्हणजे माहिती देण्याचे टाळणे असा अर्थ डॉ. पाटील यांनी लावला आहे. परंतु अनुदान न मिळालेली ही वर्षे आहेत, असे मुख्याध्यापकांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले. पत्रावर सही करताना 'मुख्याध्यापक' असा उल्लेख केला आहे, तो 'माहिती अधिकारी' असा हवा, असाही डॉ. पाटील यांच्या अपिलातील मुद्दा आहे. तसा उल्लेख करावा व मुद्दा क्र.२ मधील १९९९ च्या शासन निर्णयाची प्रत द्यावी, असा आदेश प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्याचे पालन झालेले नाही. म्हणून डॉ. पाटील यांनी दि. १८.७.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. उल्लेखाबाबतचा मुद्दा रास्त असला तरी तांत्रिक स्वरुपाचा आहे. |

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि.१.६.०४ ते १२.१२.०५ या कालावधीत शाळेतील मुलांना प्रगती पुस्तके दिली काय, असल्यास त्याची फी किती आहे, त्याची पावती दिली काय, शंतनू ज्ञानचंद्र पाटील याच्या फीची पावतीची प्रत, पावती दिली नसलयास त्याची कारणे, वरील कालावधीतील याबाबतच्या जमाखर्चाच्या हिशेबाच्या प्रती, प्रगतीपुस्तक शाळेव्यतिरिक्त बाहेर मिळत असल्यास त्याचा पत्ता, प्रगती पुस्तकाबाबत शाळेसंबंधीच्या पालकाने पत्रव्यवहार केला आहे काय, प्रगती पुस्तकांसाठी फी घेऊनही पावती का दिली जात नाही | मुख्याध्यापकांनी प्रगती पुस्तकाबाबत पैसे घेत नसल्याचे कळविले. प्रगती पुस्तक शाळेशिवाय बाहेर कोठे मिळते काय, यावर 'माहीत नाही', असे उत्तर दिले आहे. डॉ. पाटील यांचे प्रश्न व मुख्याध्यापकांची उत्तरे यांचे स्वरुप कसे आहे याचे मासलेवाईक उदाहरण येथे पहावयास मिळते. 'प्रगती पुस्तकाबाबत शाळेसंबंधीच्या पालकाने पत्रव्यवहार केला आहे काय,' असा प्रश्न डॉ.पाटील यांनी विचारला आहे. (हा पत्रव्यवहार त्यांनी स्वत:च केला असल्याचे सुनावणीत सांगितले.) त्याला मुख्याध्यापकांचे उत्तर आहे, 'होय'. डॉ. पाटील यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे दि. ३०.१२.२००५ रोजी अपील केले. त्यात त्यानी म्हटले आहे, "उत्तर देतानाच्या संदर्भामध्ये फक्त 'पत्र' असा उल्लेख केला आहे. वस्तुत:हा अर्ज के.मा.अ.कायदा २००५ चा आहे. तसा उल्लेख अपेक्षित आहे". एका वेगळया पत्रान्वये मुद्दा क्र. ७ ची माहिती कळविली असल्याचे मुख्याध्यापकांनी पत्रात म्हटले आहे. पण ही माहिती या कायद्याने मागितली असल्याने सविस्तर देणे आवश्यक आहे, असे डॉ. पाटील यांचे म्हणणे आहे. मुद्दा क्र. ४ ची कोणतीही माहिती मुख्याध्यापकांनी दिलेली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीत मुख्याध्यापकांनी प्रगती पुस्तकासाठी प्रत्येकी ५/- रुपये प्रमाणे पैसे घेतल्याचे मान्य केले, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी म्हटले आहे. माझ्‍ यापुढील सुनावणीतही ते मान्य केले. मात्र 'वर्गशिक्षकांना एकत्रित पावती दिली जाते व पूर्ण यादी ठेवली जाते', असे त्यानी स्पष्ट केले. त्याबाबतचा पुरावा ते देऊ शकले नाहीत. विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या संकीर्ण जमेची पावती देणेविषयी, तसेच अनधिकृतरीत्या पैसे गोळा न करणेबाबत मुख्याध्यापकांना सूचना दिल्या, असे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात म्हटले आहे. मुळात मुख्याध्यापकांनी खोटी माहिती दिली. शाळेत अनधिकृतरीत्या पैसे जमा केले जातात व त्याची पावती दिली जात नाही, असा याचा अर्थ होतो. ही बाब गंभीर आहे. |

अपील क्रमांक : १०४ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि.१.६.२००५ ते ३०.११.२००५ या काळात शासकीय नियमाप्रमाणे किती विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक फी, टर्म फी, सारखी किती प्रकारची फी गोळा केली जाते ? त्याची पावती दिली जाते का ? असल्यास त्याची प्रत. या फी पैकी किती फी शाळेकडे ठेऊन घेतली जाते व उर्वरीत फी चा विनिमय कसा होतो ? वरील कालावधीतील जमा खर्चाच्या छायांकित प्रती, फी ज्या विद्यार्थ्यांकडून वसुली केली जाते ते शासन परिपत्रक कोणते ? | मुख्याध्यापकांनी अपुरी माहिती दिली. मुद्दा क्र.१ मधील किती प्रकारची फी घेतली जाते याचा तपशील दिला नाही व मुद्दा क्र.४ मधील जमा बाजूची माहिती दिली, खर्चाची माहिती दिली नाही. ही माहिती द्यावी व पगार खर्चाची खातेवही ठेवावी, अशा सूचना देऊन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील निकालात काढले. 'जमा केलेल्या फीचा तपशील देणारी सुधारीत पावती तयार केली असून यापुढे ती दिली जाणार आहे' असे मुख्याध्यापकानी माझ्यापुढील सुनावणीत सांगितले. पुढे काय करणार, याची माहिती ते देतात, पण मागितलेली माहिती का दिली नाही, याचे समाधानकारक स्पष्टीकरण ते देऊ शकत नाहीत, याचीच पुनरावृत्ती येथेही झाली. |

अपील क्रमांक : १०३ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १३.६.२००५ ते नोव्हेंबर २००५ या काळात १) विद्यार्थी संख्येनुसार किती क्रीडा व चित्रकला शिक्षक आहेत २) किती शिक्षक कमी आहेत व किती तारखेपासून पदे भरली नाहीत ३) कामावर असलेल्या शिक्षकांची यादी ४) क्रीडा व चित्रकला शिक्षकांना इतर विषय व विषय शिक्षकांना क्रीडा/चित्रकला विषय दिलेल्या शिक्षकांची नावे, त्यांना देण्यात आलेल्या वर्गाची माहिती, असे तास देण्याचे कारण, कोणत्या परिपत्रकाचे आधारे असे केले त्याची प्रत ५) विषय शिक्षकांकडून त्यांना देण्यात आलेल्या क्रीडा तासास आपला बौध्दिक विषय शिकवला तर त्यांचेवर मुख्याध्यापक कोणती कारवाई करतात, असे आजपर्यंत झाले का | मुद्दा क्र. ३ व ४ मधील माहिती मुख्याध्यापकांनी अपुरी दिली. मुद्दा क्र. १ मधील शिक्षकांची संख्या देण्याऐवजी 'शासकीय नियमानुसार चित्रकला व क्रीडा शिक्षक आहेत,' असे उत्तर दिले आहे. विषयांकित शिक्षकांची यादी दिलेली नाही. संबंधित शिक्षकांना असे तास देण्याचे कारण काय, अशा स्वरुपाची स्पष्टीकरणात्मक माहिती मागता येणार नाही. एकूण उत्तरे नेमकी माहिती न देणारी आहेत. '५० टक्के वर्कलोड असावा. मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांनी त्यानुसार काम करणे आवश्यक आहे', असे प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात म्हटले आहे. अशा स्वरुपाच्या आदेशाचा माहितीचा अधिकार अधिनियमाशी संबंध नसून ती प्रशासकीय बाब आहे. मुख्याध्यापकांनी पूर्ण व नेमकी माहिती दिली पाहिजे. |

अपील क्रमांक : १०६ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि.१.१.१९८५ ते ३०.११.२००५ कालावधीतील माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील विद्यार्थीसंख्या वर्ष निहाय, विद्यार्थी/ विद्यार्थ्यीनी - निहाय स्वच्छतागृहांची संख्या, वरील कालावधीत नवीन बांधलेल्या स्वच्छतागृहांची वर्षनिहाय संख्या, या कालावधीत स्वच्छतागृह दुरुस्त केली त्याच्या तारखा व तपशील, उच्च माध्यमिक -साठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय आहे काय, या कालावधीत या साठी केलेल्या खर्चाचा तपशील | सुमारे २० वर्षांच्या कालावधीतील माहिती मागितली आहे. या कालावधीत स्वच्छता गृहांची दुरुस्ती केव्हा केली त्याच्या तारखा व कामाचा तपशील ही माहिती मुख्याध्यापकांनी दिलेली नाही. तसेच वर्षनिहाय माहितीही दिलेली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी ही माहिती देण्याचा आदेश दिला. ५० विद्यार्थ्यांमागे एक मुतारी व २०० विद्यार्थ्यांमागे एक शौचालय, मुलींसाठी स्वतंत्र व्यवस्था असणे कायद्याने बंधनकारक आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी सांगितले. या शाळेची पाहणी करुन माहितीची खात्री केली जाईल व आवश्यक तर योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी कबूल केले. स्वच्छतागृहांची दुरुस्ती आदींचा वीस-वीस वर्षांचा तपशील विद्यार्थ्यांहिताच्या संदर्भात किती महत्वाचा आहे, हे अपीलकर्ता समाधानकारीत्या स्पष्ट करु शकले नाहीत. |

अपील क्रमांक : १०५ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
| --- | --- |
| दि. १.६.२००० ते १२.१२.२००५ मधील वार्षिक स्नेहसंमेलन व लड्डे फेस्टीव्हल यापैकी शासकीय नियमांनुसार कोणता आहे, त्यासाठी कोणाची परवानगी आवश्यक आहे ते दर्शविणाऱ्या आदेशाची प्रत. या कार्यक्रमांची मंजुरी शिक्षक-पालक संघामध्ये घेतली काय १ असल्यास बैठकीच्या इतिवृत्तांची प्रत. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली जाते, ती घेण्यास परवानगी आहे काय, फी ची पावती दिली जाते काय, हिशेब ठेऊन तपासनीसाकडून मंजुरी घेतली काय, घेतलेली फी शाळेकडे की संस्थेकडे जमा होते | विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वार्षिक स्नेहसंमेलन व त्या स्वरुपाचे कार्यक्रम घेतले जातात. लड्डे फेस्टिवल व स्नेहसंमेलन हें दोन्ही कार्यक्रम एकत्र घेतले जातात. यासाठी शाळेने फी घेतली नाही, असे मुख्याध्यापकानी दि. २३.१२.२००५ च्या उत्तरात म्हटले आहे. असे कार्यक्रम घेण्यासाठी शासकीय परिपत्रक आहे का, त्याची प्रत मिळाली नाही असे डॉ. पाटील यांनी प्रथम अपिलात म्हटले आहे. अशा कार्यक्रमाना शिक्षक-पालक संघाची परवानगी घेतलेली नाही, हे मुख्याध्यापकानी उत्तरात व प्रथम अपिलाच्या सुनावणीतही मान्य केले आहे. अशी परवानगी घ्यावी अशा सूचना अपिलीय प्राधिका-यांनी दिल्या. माहिती देण्यापेक्षा प्रत्यक्ष कामकाजाच्या सूचना अपिलीय प्राधिका-यांनी दिल्या. हे माहितीचा अधिकार अधिनियमाला धरुन नाही, असा आक्षेप डॉ.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात घेतला आहे. प्रत्येक कार्यक्रमासाठी अशा प्रकारच्या परिपत्रकाची अपेक्षा करणे हे अति-तांत्रिक स्वरुपाचे आहे. मात्र लड्डे महोत्सवासाठी १० ते ५० रुपये वर्गणी विद्यार्थ्यांकडून घेतली जाते व त्याची पावती दिली जात नाही, हे मुख्याध्यापकानी माझ्यापुढील सुनावणीत मान्य केले. अपिलीय प्राधिका-यांनी याबाबतची शहानिशा करुन घेणे आवश्यक होते, ती घेतलेली नाही. तसेच घेतलेल्या फीचा हिशोब ठेवून तपासनीसाकडून मंजुरी घेतली आहे काय, आणि ही फी शाळेकडे जमा होते की संस्थेकडे जमा होते, याचे उत्तर मुख्याध्यापकानी दिले नाही व अपिलीय प्राधिका-यानी त्याची दखल घेतलेली नाही. |

अपील क्रमांक : १०८ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
| --- | --- |
| दि. १३.६.२००५ ते १२.७.२००५ या काळातील इयत्ता ७ वी ब चे वार्षिक वेळापत्रक केव्हा तयार झाले तो दिनांक, तयार करण्याची जबाबदारी कोणावर होती, पर्यवेक्षण कोणाचे होते (२) विषय शिकवण्याची जबाबदारी कोणावर होती ती त्यांनी केव्हा पार पाडली, ज्या आदेशाने ती जबाबदारी देण्यात आली त्या आदेशाची प्रत (३) या कालावधीत कोणी शिकवण्यास आले नाही म्हणून विद्यार्थ्याने लेखी तक्रार केली आहे काय १ असल्यास त्यावर केलेली कार्यवाही व त्या संदर्भातील पत्रोत्तराची छायांकित प्रत (४) संबंधित शिक्षकाने शाळा सुरु झाल्यापासून कोणत्या कारणास्तव शिकवले नाही, याबाबत संबंधित पर्यवेक्षकाने केलेल्या पर्यवेक्षण नोंदवहीची प्रत, तसेच तास न घेतल्याबद्दल संबंधित शिक्षकाला लेखी विचारणा केली काय, त्याची प्रत नसल्यास त्याचे कारण | मुद्दा क्र. १ व २ बाबत 'वेळापत्रक तयार असते, त्यात गरजेनुसार बदल केले जातात', 'विषय शिक्षकांची जबाबदारी असते,' असे मुख्याध्यापकांनी कळविले. मुद्दा क्र. ४ बाबत पर्यवेक्षकांनी केलेल्या पर्यवेक्षण नोंदवहीबाबत दि. १७.१०.२००५ च्या पत्रान्वये कळविले असल्याचा उल्लेख केला आहे. मुद्दा क्र. ३ चे स्पष्ट उत्तर दिलेले नाही. या स्वरुपाची तक्रार आपणच विद्यार्थ्यामार्फत दिली होती, असे डॉ.पाटील यांनी राज्य माहिती आयोगापुढे सुनावणीत सांगितले. 'वेळापत्रकावर विषय शिक्षकाचे नाव द्यावे, विद्यार्थ्याच्या तक्रारीची प्रत द्यावी,' असे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.४.२.२००६ रोजी सुनावणी घेतली व आदेश मात्र दि.२१.४.२००६ रोजी दिला. हवी असलेली माहिती मिळावी, कामकाजात टंगळमंगळ केल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी डॉ. पाटील यांनी याही अपिलाच्या सुनावणीत मांडली.<br>मूळ विषयाचे नेमके उत्तर न देण्याची मुख्याध्यापकांची पध्दती या अपिलाबाबतही दिसून येते. |

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १.६.२००३ ते २२.११.२००५ या काळात (१) सायकल स्टँड शाळेच्या आवारात आहे का १ ते नियमानुसार आहे का, त्यावर छत कशाचे आहे, शेडचे डांब कशाचे आहेत (२) स्टँडचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या (३) सायकल व वाहनासाठी वेगळी सोय आहे का, फी कशी आकारली जाते (मासिक,त्रैमासिक) या रकमेचा तपशील, फी वसुल कोण करतो, त्याची पावती दिली जाते का, नसल्यास कारणे (३) शासन आदेशाप्रमाणे किती फी घेता येते. त्याची प्रत. (४) तपासणी अधिकाऱ्याकडून या फी ची व हिशोबाची तपासणी केली गेली आहे काय, तपासणीनंतरच्या सुचना व त्यावरील कार्यवाहीची प्रत (५) स्टँडवर नेमलेल्या कर्मचाऱ्याचे नाव/ पत्ता/ कामाचा कालावधी, महिनानिहाय पगार (६) या बाबतचा जमा खर्च (७)एखाद्याने फी भरली नाही हे ओळखण्याची पध्दती. | मुख्याध्यापकानी संदिग्ध स्वरुपाची उत्तरे दिली आहेत. मुद्दा क्र.६ च्या उत्तरात सदरची योजना स्वतंत्ररीत्या राबविली जाते, असे म्हटले आहे. परंतु त्याचा तपशील दिलेला नाही. स्पष्टीकरणात्मक तपशीलाशिवाय हे उत्तर निरर्थक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याकडून सायकल स्टँडसाठी किती फी घ्यावी याबाबत शासकीय परिपत्रक नाही, असे उत्तरात म्हटले आहे व अपिलीय प्राधिका-यांनीही ते मान्य केले आहे. प्रत्यक्षामध्ये तीन रुपये फी घ्यावी असा शासकीय आदेश असल्याचे उभयतांनी माझ्या पुढील सुनावणीत मान्य केले. सायकल स्टँडवर छताची व्यवस्था करावी, नियमानुसार फी घ्यावी, अशा स्वरुपाच्या सूचना डॉ. पाटील यांनी यावेळी केल्या. या सूचना महत्वाच्या असल्या तरी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेतील नाही. उपलब्ध झालेल्या माहितीवर आधारित पुढील कृतीबाबतचा तो भाग आहे. |

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १२.७.०५ ते २१.१.०६ या कालावधीमधील पुढील माहिती विचारली आहे : १) केंद्रीय माहिती कायद्यानुसार माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांच्या नेमणुकांचा फलक प्रदर्शित केला असल्यास त्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती २) केंद्रीय माहिती कायद्यानुसार स्वेच्छा माहिती संकलीत केली असल्यास प्रदर्शित केल्याची तारीख ३) विद्यार्थ्यांसाठी नोटीसबोर्ड आहे का, माहितीच्या कालावधीत किती नोटीस प्रदर्शित केल्या ४) विद्यार्थ्यांकडून घ्यावयाच्या फीच्या नाटिसा त्यामध्ये प्रदर्शित केल्या काय ५) केंद्रीय माहिती अधिकारानुसार संकलीत माहिती पाहण्याची तारीख मिळावी | डॉ. पाटील वेळोवेळी पत्रे पाठवून माहितीच्या अधिकार अधिनियमाचा गैरवापर करीत आहेत, असा अरोप करणारे पत्र मुख्याध्यापकांनी दि. ६.२.०६ रोजी त्याना पाठविले. डॉ. पाटील यांनी दि. २०.२.०६ रोजी पत्र पाठवून कागदपत्रांच्या पाहणी संदर्भात वेळ देण्याची पुन्हा मागणी केली. पाहणीसाठी सोयीची वेळ व तारीख, काय पाहणी करणार, लागणारा कालावधी कळविण्यास जन माहिती अधिकाऱ्यानी दि. २७.२.०६ च्या पत्रान्वये सुचविले. डॉ. पाटील यांनी दि. ३१.३.०६ रोजी पत्र पाठवून शालेय तपासणी अहवालातील तृटींच्या पूर्ततेसंबंधी आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशील, हालचाल नोंदवही, इत्यादी माहिती पाहण्यास येत असल्याचे कळविले. यासंदर्भात 'तुम्ही आमच्याकडे पत्रांची व अर्जांची शृखंला चालू केली आहे. आमचेकडील कर्मचारी लोकांचा व शिक्षकांचा बहुतांश वेळ तुमच्या पत्राला उत्तर देणे व तुमच्या पत्रांची देखभाल करणे यामध्येच खर्ची पडत आहे. परिणामी शैक्षणिक कामावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे', असे नमूद करुन 'संबंधित कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अशक्य' असल्याचे मुख्याध्यापकांनी कळविले. प्रथम अपिलाची सुनावणी झाली नाही. ठरलेल्या वेळेनुसार मुख्याध्यापकांनी पाहणी करु देणे आवश्यक होते, असे डॉ. पाटील यांनी म्हटले आहे. मात्र सातत्याने व विपुल प्रमाणात माहिती मागितल्यास ती पुरविण्यात येणाऱ्या अडचणींचा मुख्याध्यापकांनी केलेला उल्लेख लक्षात घेण्यासारखा आहे. |

अपील क्रमांक : १०९ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि.१.६.२००५ ते १५.११.२००५ या कालावधीत माध्यमिक शाळा संहिता नियम (७३.५) नुसार शाळेच्या प्रमुखाने-सह प्रमुखाने व पर्यवेक्षकाने आठवडयात एकूण शिकविण्याचे काम करत असलेल्या वर्गाची, विषयांची तासनिहाय माहिती, तसेच तिघांचेही शिक्षकनिहाय पर्यवेक्षणाची यादी (२) वरील कालावधीपैकी दि. २२.६.२००५ रोजी केलेल्या पर्यवेक्षणाची छायांकित प्रत | मुद्दां क्र. २ मधील पर्यवेक्षणाची छायांकित प्रत मुख्याध्यापकांनी दिली नाही. त्याऐवजी 'पर्यवेक्षणाचे काम नियमानुसार केले जाते,' असे सर्वसाधारण सूत्र कळविले आहे. नेमकी माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. दि. ३०.१२.२००५ च्या प्रथम अपिलाची सुनावणी दि. ३०.१.२००६ पर्यंत होणे आवश्यक असताना दि. ४.२.२००६ रोजी घेतली व आदेश मात्र दि. २१.४.२००६ रोजी पाठविले. रु.५००/- नुकसान भरपाई मिळावी, माहिती मिळावी व कामकाजात टंगळमंगळ केल्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी डॉ. पाटील यांनी माझ्यापुढील सुनावणीत केली. |

अपील क्रमांक : ११० सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १.६.२००४ ते १५.११.२००५ या काळातील माहिती मागितली आहे. शाळेतील पाण्याच्या टाक्यांची एकूण संख्या (२) माध्यमिक शाळा संहिता नियम ४७ (६) नुसार विद्यार्थी ग्राहकांचे आरोग्यासाठी किती दिवसातून त्या स्वच्छ केल्या गेल्या आहेत त्याच्या तारखा (३) प्रत्येक टाकीवर स्वच्छ केल्याची व पुढील स्वच्छ करण्याची तारीख नोंद केली आहे काय | मुख्याध्यापकांनी कळविलेल्या संख्येपेक्षा जास्त टाक्या आहेत व टाक्या स्वच्छ करण्याची व पुढील तारीख नोंदविली जाते हे उत्तर खोटे आहे, असे डॉ. पाटील यांनी म्हटले आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांचे म्हणणे मान्य केले. टाक्या स्वच्छ करण्याची पुढील तारीख टाक्यांवर नोंदण्याचे आदेश त्यांनी दिले. त्यानुसार कृती झाली नाही म्हणून डॉ. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले. 'मुख्याध्यापकांशी विद्यार्थीहितार्थ चर्चेसाठी सामान्य पत्रव्यवहार केला. पण मुख्याध्यापकांकडून सकारात्मक कृती व सहकार्य झाले नाही, म्हणून' अपील करीत असल्याचे त्यानी म्हटले आहे. मूळ अर्जापेक्षा अधिक मागणी करणारा असा हा विस्तार आहे. टाक्यांवर लिहिलेल्या तारखा पुसल्या जातात, असे मुख्याध्यापकानी माझ्यापुढील सुनावणीत सांगितले व स्वतंत्रपणे नोंद ठेवण्याची तयारी दर्शविली.<br>प्रथम अपिलाच्या सुनावणीला चार दिवस विलंब झाला आहे, व सुनावणी झाल्यापासून ४७ दिवसांनी अपिलाचा निर्णय दिला आहे. |

अपील क्रमांक : ११३ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १.६.१९८५ ते १.६.२००५ या कालावधीत शिक्षण उपसंचालक कार्यालयाने केलेल्या १) सांगली हायस्कूलच्या तपासणीच्या तारखा २) शेवटच्या दोन तपासणीच्या अहवालाच्या प्रती ३) त्रुटींबाबत मुख्याध्यापक /संस्थाचालक यांचेकडून दुरुस्ती करुन घेतली क्र १ हे पाहण्याची जबाबदारी कोणाची हे दर्शविणाऱ्या शासन निर्णयाची प्रत ४) त्रुटी किती दिवसात दूर कराव्यात व न केल्यास कोणत्या नियमानुसार कारवाई केली जाते हे दर्शविणाऱ्या शासन निर्णयाची प्रत ५) शाळेवर कारवाई केली असल्यास त्याची प्रत | मुद्दा क्रमांक १ व २ ची माहिती संबंधित शाळेकडून घ्यावी. मुद्दा क्रमांक ३ ते ५ बाबतची स्पष्टीकरण महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा नियमावली नियम ८१ अनुसूचि 'ज' मध्ये आहे व तपासणी अहवालातील त्रुटींची पूर्तता करणेबाबत स्वतंत्र पत्राने कळविले जाते, असे मुख्याध्यापकांनी उत्तरात कळविले आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचे निर्णय रास्त आहेत, असे ठरवून मुद्दा क्रमांक ३ ते ५ शी संबंधित असलेल्या सेवा शर्ती नियमावलीच्या छायाप्रती पाठविल्या.<br>केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांना माहीत नाही, असे वरील बाबींवरुन दिसते. १. जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित अर्ज पाच दिवसांत शाळेकडे पाठविणे आवश्यक होते. तसेच, शाळेची तपासणी शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर यांनीच केलेली असल्यामुळे संबंधित माहिती तेथेच देणे शक्य होते. सेवा शर्तींची नियमावली अपिलीय प्राधिकाऱ्यांनी पाठविण्याऐवजी जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरासोबतच देता आली असती. 'माहितीच्या अधिकारात सुनावणीसाठी उपस्थित न राहता म्हणणे सादर करण्याची तरतूद नाही,' असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी म्हटले आहे, ते निराधार आहे. आपली बाजू कशा प्रकारे मांडावी याचा अर्जदाराला पूर्ण अधिकार आहे. निवेदन सादर करुन अर्जदाराचे समाधान होत असेल तर उपस्थित राहण्याची सक्ती करता येणार नाही. माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली आहे, हा डॉ. पाटील यांचा आक्षेप रास्त नाही. |

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १.६.२००४ ते ३०.११.२००५ या कालावधीत शाळेच्या वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले होते काय, असल्यास त्याचा जमाखर्च व बैठकांचा अहवाल (२) स्पर्धासाठी प्रवेश फी घेतली का, असल्यास खेळनिहाय तपशील (३) स्पर्धेचा खर्च कशातून करावा असे शासनाचे निर्देश आहेत, या बाबतच्या परिपत्रकाच्या प्रती (४) प्रवेश फी घेण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेतली काय, असल्यास त्याची प्रत (५) प्रवेश फी ची पावती दिली काय, ही फी जमाखर्चास घेण्यात आली काय, (६) एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश फी देऊन पावती मागितली काय, ते सिध्द करणाऱ्या कागदपत्रांची प्रत | क्रीडा स्पर्धेसाठी शुल्क घेतले नसल्याचे मुख्याध्यापकांनी उत्तरात कळविले. टर्म फी मधून स्पर्धेचा खर्च केला जातो, असे त्यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीत सांगितले. मात्र ''बिरनाळेसर यांनी प्रत्येकी १/- रुपया शुल्क घेतले असल्याचे' त्यांनी मान्य केले. डॉ. पाटील यांचा इयत्ता ७ वी मधील मुलगा शंतनु व त्याचे ९ संघ सदस्य यांनी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे प्रवेश शुल्क म्हणून १०/- रुपये दिल्याचा अर्ज डॉ. ज्ञानचंद्र पाटील यांनी सादर केला. इयत्ता ७ वी मधील विद्यार्थ्यीही माहितीच्या अधिकारातंर्गत पुराव्यासाठी शिक्षकाकडे अर्ज सादर करतात, हा यातील लक्षात घेण्याजोगा भाग आहे. शुल्क घेतल्याचे प्रथम अपिलात मान्य केल्यानंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांना 'बिरनाळेसर यांची चौकशी करुन अहवाल देण्याचा आदेश' दिला. दि. ३०.१२.०५ रोजी केलेल्या अपिलाची सुनावणी त्यानी दि. ६.३.२००६ रोजी म्हणजे ३६ दिवस उशिराने केली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा हा भंग आहे. स्पर्धेत मुले फार मोठया प्रमाणावर भाग घेतात, ती संख्या मर्यादित व्हावी म्हणून १/- रुपया घेतला, त्याच्या गोळया विद्यार्थ्यांना दिल्या. असे तोंडी चौकशीमध्ये संबंधित शिक्षकांनी सांगितल्याचे मुख्याध्यापकांनी माझ्यापुढील सुनावणीत नमूद केले. परंतु टर्म फीच्या खर्चातही विद्यार्थ्यांकरिता गोळ्या-बिस्किटांसाठी तरतूद असते, असे शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. |

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| दि. १८.१२.१९९५ ते १७.१२.२००५ शिक्षणाधिकारी / उपशिक्षणाधिकारी यांनी सांगली हायस्कूलच्या केलेल्या तपासणीच्या तारखा व अहवालाच्या प्रती<br>सदर अहवालातील त्रुटी, पुढील तपासणीत दुरुस्त झालेचे आढळले काय, नसल्यास शाळेवर काय कार्यवाह होऊ शकते या बाबतच्या परिपत्रकाच्या प्रती व केलेल्या कार्यवाहीच्या प्रती<br>त्रुटी दुरुस्त झाल्या की नाही हे पाहण्याची जबाबदारी कोणाची हे दर्शविणाऱ्या शासन परिपत्रकाच्या प्रती. | संबंधित माहिती दि. १८.१२.१९९५ ते १७.१२.२००५ या १० वर्षांच्या कालावधीतील असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यांनी एक महिन्याची मुदत दि. ४.१.२००६ च्या पत्रान्वये मागितली व दि.२८.२.२००६ रोजी माहिती पाठविली. ही माहिती मिळण्यापूर्वी डॉ. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे दि. १७.२.२००६ रोजी अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी न घेता दि. २०.३.२००६ रोजी शिक्षणाधिकारी यांचा निर्णय योग्य ठरवून अपील निकालात काढले. त्याविरुध्द डॉ. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.४.२००६ रोजी अपील दाखल केले आहे. कलम ४ अन्वये स्वतंत्र माहिती तयार करण्याचा मूळ अर्जात नमूद नसलेल्या मागणीचा उल्लेख डॉ. पाटील यांनी अपिलात केला आहे. तसेच, माहिती देण्याची मुदत मागण्याची तरतूद नसताना मुदत मागितली, असा आक्षेप घेतला आहे व माहिती नाकारली, असा त्याचा अर्थ लावला आहे. मागितलेली माहिती १० वर्षांच्या कालावधीतील असल्यामुळे ती संकलित करण्यासाठी असा कालावधी आवश्यक होता, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या वतीने त्याला दुजोरा देण्यात आला. माहितीचे स्वरुप व कालावधी लक्षात घेता वाढीव मुदत मागणे अयोग्य नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयात माहितीसाठी झालेल्या विलंबाची नोंद घेतलेली नाही. तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. ए.आर. काईंगडे यांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून तपासणी अहवाल प्राप्त करुन घेण्यास काही कालावधी लागला, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे उत्तरवादीच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आले. परंतु मूळ अर्ज दिनांक २१/१२/२००५ चा व माहिती दिनांक २८/२/२००६ रोजी देण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार माहिती देण्यासाठी असलेली ३० दिवसांची मुदत व विनंती करुन मागितलेली ३० दिवसांची वाढीव मुदत असे ६० दिवस गृहीत धरले तरी माहिती देण्यास ७ दिवस विलंब झाला आहे. |

अपील क्रमांक : ३२ सांगली

| मागितलेली माहिती | विवेचनातील ठळक मुद्दे |
|---|---|
| माध्यमिक शाळा संहिता नियमांनुसारदि. १.१.०२ ते ३१.३.०५ या कालावधीतील जडवस्तू संग्रहातील वस्तूंच्या नोंदवहीची छायांकित प्रत, शाळेमध्ये असणाऱ्या पंख्यांची संख्या, पैकी विकत घेतलेले किती, देणगी मिळालेले किती; ते कोणी दिले, एकूण आरसे किती आहेत, पंखे व आरसे खरेदीच्या पावतीच्या प्रती | जड वस्तू संग्रहातील वस्तूंच्या नोंदवहीची छायांकित प्रत डॉ. पाटील यांनी मागितली होती. त्याला मुख्याध्यापकांनी दिलेले उत्तर 'जडवस्तूंची नोंदवही ठेवलेली आहे 'असे आहे. पंखे देणगी रुपाने मिळाले नसल्याचे नमूद केले आहे. देणगी रुपाने दिलेल्या वस्तूंची नोंदच ठेवली जात नसल्यामुळे मुख्याध्यापक माहिती देऊ शकले नाहीत, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. ६.३.२००६ च्या आदेशात नमूद केले आहे व रजिस्टर ठेवण्याची सूचना देऊन अपील निकालात काढले आहे. दिलेली माहिती चुकीची आहे. कारण एक पंखा आपणच देणगी म्हणून दिला आहे, असे डॉ. पाटील यांनी माझ्यापुढील सुनावणीदरम्यान स्पष्ट केले. मुख्याध्यापकांनी ते मान्य केले. आपण देणगी दिलेली असूनही पावती मात्र एक पंखा खरेदीची आहे. याच पध्दतीने देणगी वस्तूंबाबत नोंद केली जात असल्यामुळे आर्थिक व्यवहाराविषयी साशंकता निर्माण होते, असे डॉ. पाटील यांनी निदर्शनास आणले. मुख्याध्यापक त्यावर स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. |

५. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेले आदेश त्रोटक शब्दांत आहेत, असा आक्षेप डॉ. पाटील यांनी अनेक ठिकाणी नोंदविला आहे. परंतु कमी शब्दांत आदेश हा दोष होऊ शकत नाही. आदेश सुस्पष्ट आहे की नाही आणि तो योग्य आहे की नाही, हे दोनच मुद्दे महत्वाचे आहेत. मात्र, अपिलीय प्राधिकाऱ्यांचे आदेश साचेबध्द पध्दतीचे आहेत व मूळ मागणीचा बारकाईने विचार करणारे नाहीत. त्यात कोठेही कारणमीमांसा दिलेली नाही व पुढील अपिलाबाबतची माहितीही दिलेली नाही. तसेच नियमानुसार विहित मुदतीत अपिलांची सुनावणी होणे आवश्यक आहे. तसे त्यांनी क्वचितच केले आहे. हे वर्तन नियमबाहय आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत असलेल्या त्रुटींची जाणीव शिक्षण विभागाच्या उपस्थित अधिकाऱ्यांना करुन दिली. या त्रुटी आपण दूर करु व आदेशाच्या अंमलबजावणीबाबत दक्षता घेऊ, असे शिक्षण अधिकारी श्री. भिमराव पी. कांबळे यांच्या वतीने उपशिक्षण अधिकारी श्री. हैबतराव शंकरराव नांगरे पाटील, शिक्षण सहसंचालक श्री. व्ही.बी.पायमल व शिक्षण उपसंचालक श्री. एस.के.जाधव यांनी कबूल केले. यापुढे याबाबतीत दक्षता घेण्याची त्यांनी दिलेली हमी स्वीकारण्यात येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत गाऱ्हाण्यांची दखल विहीत मुदतीत, तसेच अधिक गांभीर्याने व परिणामकारकरीत्या घेणे आवश्यक आहे, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

६. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी (प्रामुख्याने शिक्षण अधिकारी- माध्यमिक, जिल्हा परिषद, सांगली यांनी ) दिलेल्या बहुसंख्य आदेशांत माहितीचा अधिकार अधिनियमाबरोबरच शैक्षणिक अधिकारी म्हणून असलेल्या प्रशासकीय अधिकारांचा समावेश दिसून येतो. मात्र, 'मुख्याध्यापकांना आदेश दिले, सुधारणा करण्याचे त्यांनी मान्य केले', असे बहुसंख्य आदेशांचे स्वरुप आहे. परंतु त्यातील कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी झाली की नाही याची खात्री संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली नाही व मुख्याध्यापकांनी त्याबाबतचा पूर्तता अहवाल संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्यांना सादर केलेला नाही. परिणामी अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनही अनेक बाबतींत अर्जदाराला माहिती मिळालेली नाही, अशी परिस्थिती दिसते.

७. आपण आवश्यक तेथे माहिती दिली. परंतु अर्जदाराचा आग्रह केवळ माहितीचाच नसून, त्यांनी केलेल्या सूचना अंमलात आणण्याचा (उदाहरणार्थ - घेतल्या जाणाऱ्या शुल्काच्या एकत्रित पावत्या विद्यार्थ्यांना द्याव्यात, टाक्या स्वच्छ करण्याच्या तारखा टाकीवर नोंदवाव्यात, आपण करीत असलेल्या सूचनांच्या संदर्भात नियमितपणे बैठका घेऊन आपल्याशी चर्चा करावी इ.) त्यांचा आग्रह असतो. याबाबतच्या कार्यवाहीवर आपण अधिक भर देतो, असे मुख्याध्यापकांनी

या सर्व अपिलांची सुनावणी केल्यावर पुढील बाबी ठळकपणे नोंदविणे आवश्यक आहे :

१. डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी नमूद केल्याप्रमाणे 'विद्यार्थी हितार्थ व शिक्षण संस्थांचा कारभार अधिकाधिक पारदर्शक असावा या उद्देशाने' सांगली हायस्कूल, सांगली या शाळेकडे सातत्याने व विपुल प्रमाणात अर्ज केले आहेत. त्यांनी नमूद केलेला उद्देश स्तुत्य आहे. परंतु एकेका दिवशी १०-१० अर्ज करणे व दीर्घ कालावधीतील माहिती मागणे यामुळे शाळेच्या दैनंदिन कामावर परिणाम होतो. तसेच, आपल्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो, असे प्रतिपादन मुख्याध्यापक श्री. ढोले यांनी सुनावणीत सातत्याने केले. डॉ. पाटील यांनी मागितलेली माहिती पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची, शौचालय-मुताऱ्यांची संख्या व स्वच्छता येथपासून विविध प्रकारच्या जमाखर्चापर्यंत विविध विषयांशी संबंधित आहे. एवढया माहितीचे संकलन एवढया सातत्याने करणे अडचणीचे होत आहे, असे श्री. ढोले यांनी विस्ताराने निदर्शनास आणून दिले.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी बहुसंख्य अर्जातील माहितीच्या मागणीबाबत स्पष्ट उत्तरे दिलेली नाहीत. माहितीच्या संदर्भात दिलेल्या उत्तरांमध्ये संदिग्धता असता कामा नये याची दखल त्यांनी घेतलेली नाही. शुल्क घेण्यापासून शिक्षकांच्या पर्यवेक्षणापर्यंत विविध प्रश्नांवर त्यांनी दिलेली उत्तरे पाहता ही संदिग्धता जाणीवपूर्वक असावी, या डॉ. पाटील यांच्या आक्षेपाला पुष्टी मिळते.

३. विविध स्वरुपातील व विविध कारणांसाठी शुल्क घेणे, त्याबद्दल स्पष्टता/अधिकृतता नसणे, पावत्या न दिल्या जाणे, संबंधित हिशेब न दिले जाणे, असे हिशेब ठेवले जातात की नाही, याबद्दल साशंकता निर्माण होण्यासारखी परिस्थिती असणे हे अत्यंत गंभीर आहे. त्याबद्दलचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी देऊ शकले नाहीत.

४. 'अण्णासाहेब लट्ठे एज्युकेशन सोसायटीची ही शाळा आहे. शिक्षण संस्थेमध्ये मुख्याध्यापक हेच जनमाहिती अधिकारी असतात त्यामुळे माहिती देण्यास ते जबाबदार असले तरी संस्था चालकांच्या सहकार्याशिवाय ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडता येणार नाही, असे आयोगापुढे आलेल्या विविध सस्थांबाबतच्या अपिलांवरुन दिसून येते. त्यामुळे अशा बाबतीत जन माहिती अधिकाऱ्यांबरोबरच संस्था चालकांचीही जबाबदारी महत्वाची ठरते. म्हणून दोषी आढळणाऱ्या मुख्याध्यापकांवरील कारवाईबाबत विचार करण्याबरोबरच संस्थेच्या भूमिकेचीही गंभीर दखल घेणे अपरिहार्य ठरेल. संस्थाचालकांनी याची नोंद घेणे आवश्यक आहे.

आवश्यक शैक्षणिक कामकाज सोडून माहिती संकलन करण, कागदपत्रांच्या नक्कला करणे व कागदपत्रांचा शोध घेणे, यामुळे दैनंदिन कामकाजात व्यत्यय येत आहे. याचा विचार करुन आपण यापुढे माहिती अधिकाराचा योग्य वापर करावा अशी अपेक्षा आहे. "

११. मुख्याध्यापकांनी डॉ. पाटील यांच्या उद्देशाबद्दल शंका घेणे आक्षेपार्ह आहे. परंतु माहितीच्या संकलनासाठी लागणारी यंत्रणा, वेळ व ताण हा त्यांचा मुद्दा दुर्लक्षित करण्यासारखा नाही. माहितीचा अधिकार कायद्याचे गांभीर्य, प्रतिष्ठा व परिणामकारकता राखणे ही फक्त माहिती देणा-यांची जबाबदारी नाही, तर माहिती मागणा-यांचीही आहे. कायद्याचा वापर कशासाठी व कशा प्रकारे केला जातो याला त्यात विशेष महत्व आहे. हे लक्षात घेऊन डॉ. पाटील यांनी आपल्या अर्जांचे प्रमाण, विषयांचे स्वरुप याबाबत तारतम्य बाळगावे, अशी सूचना त्याना देण्यात येत आहे.

१२. माहितीचा अधिकार हा अत्यंत महत्वाचा आहे, हे नि:संशय. परंतु त्याचा तारतम्यानेच वापर केला गेला पाहिजे. तसा तो न होणे या अधिकाराच्या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीला मारक ठरेल. तसेच त्याचे गांभीर्यही अप्रत्यक्षरीत्या कमी लेखले जाईल. कोणाच्याही कोणत्याही कृतीने तसे होणे मान्य करता येणार नाही.

वरील अपिले व त्या अनुषंगाने उभय बाजूंची भूमिका यांचा विचार करुन मी पुढील आदेश देत आहे :

## आ दे श

१. डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी मागितलेल्या माहितीमध्ये असलेल्या जमाखर्च व तत्सम आर्थिक विषयांची माहिती दि. १५.५.२००७ पर्यंत द्यावी, असे आदेश सुनावणीचे वेळीच दिले होते. त्यानुसार दिलेल्या माहितीच्या प्रतींसह दि. २५.५.२००७ पर्यंत पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

२. वर नमूद केलेल्या आर्थिक विषयांची माहिती वर दिलेल्या मुदतीत दिली गेली नाही तर संस्थेवर वेतनेतर अनुदान बंद करण्यासारखी कडक कारवाई करणे शक्य आहे. उपशिक्षण अधिकारी श्री. हैबतराव शंकरराव नांगरे पाटील यांनी सुनावणीच्या दरम्यान तसे स्पष्ट निवेदन केले आहे. माहितीच्या मागणीप्रमाणे आर्थिक बाबींचे हिशेब सादर न केल्यास, तसेच शुल्काच्या पावत्या देणे, अनाधिकृत शुल्क न घेणे याबाबत काटेकोरपणे आदेशांचे पालन न केल्यास वेतनेतर

सांगितले. ते काही प्रमाणात योग्य असल्याचे अर्जदाराने मान्य केले व शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला. अर्थात हा अनुषंगिक भाग आहे. माहिती वेळेत व नेमकी दिली पाहिजे हा माहिती अधिकार अधिनियमातील सर्वांत महत्वाचा भाग कृतीत उतरलाच पाहिजे.

८. आपल्याला अद्यापपर्यंत न मिळालेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांना मुदतीची मर्यादा घालून द्यावी. त्यांनी वेळेत माहिती दिली नसल्यामुळे त्यांना शास्ती लावावी, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलांच्या सुनावणीत केलेल्या दिरंगाईची दखल घेऊन, त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी अपीलकर्ता डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील यांनी केली. आपल्याला झालेल्या मनस्तापाबद्दल नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणीही त्यानी बहूसंख्य अपिलात केली आहे. अपीलकर्त्याप्रमाणेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनीही अशा सातत्याने व मोठया प्रमाणावरील अर्जामुळे आपल्याला मनस्ताप होत असल्याचे सांगितले. नुकसान भरपाईबाबत निर्णय करताना उभय बाजूंचा विचार करावा लागेल. फक्त अर्जदाराचा विशेषाधिकार असे त्याचे स्वरुप गृहीत धरता येणार नाही.

९. आपण जास्तीत जास्त माहिती प्रामाणिकपणे देण्याचा प्रयत्न केला. कोणतीही माहिती टाळण्याचा प्रयत्न हेतूपुरस्सर केला नाही. कायदेशीर बाबींच्या पूर्ततेत अनवधानाने आपल्याकडून काही चुका झाला आहेत, त्या सुधारण्याची संधी द्यावी, अशी विनंती मुख्याध्यापक श्री. ढोले यांनी केली. ३००० विद्यार्थ्यांची शाळा सांभाळणे व तिची प्रगती साधणे यासाठी आपण प्रयत्नशील असून आपल्याला त्यावर अधिक लक्ष केंद्रित करता यावे, अशी आपली भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

१०. दि. ६.२.२००६ रोजी डॉ. पाटील यांना लिहिलेल्या पत्रात श्री. ढोले यांनी म्हटले आहे, "माहिती अधिकाराखाली आपण आजतागायत आमचे शाळेकडे अनेक अर्ज केलेत आजपर्यंत आपण माहिती अधिकाराखाली १६ पत्रे व नियमित ९ पत्राव्दारे असे एकूण २५ पत्रांनी माहिती मागविली आहात. त्याप्रमाणे आपणांस वरील पत्रांची माहिती वेळोवेळी पत्राव्दारे दिलेली आहे. आपण केलेल्या वरील अर्जाची संख्या व श्रृंखला विचारात घेता आपण मागितलेली माहितीही पुरेपूर माहिती आपणांस आहे हे स्पष्ट आहे. एवढया प्रचंड प्रमाणात माहितीच्या अधिकाराखाली वारंवार अर्ज करणे हे खरोखरच माहितीचे अधिकाराखाली असलेल्या तरतुदींचा प्रामणिक वापर आहे का १ याचा आपण गांभीर्याने विचार करावा अगर मागितलेली माहिती पुरविणेसाठी दैनंदिन

अनुदान बंद करण्यासारख्या कारवाईचा विचार करावा लागेल, याची जाणीव मुख्याध्यापकांना व त्यांचेव्दारे संस्थाचालकांना देण्यात येत आहे.

४. विद्यार्थ्यांकडून विविध कारणांसाठी घेतले जाणारे शुल्क, त्याचा विनियोग, पावत्या न दिल्या जाणे, संस्थेने शुल्क न घेता काही शिक्षकांनी ते पावत्या न देता घेणे, या संदर्भातील हिशेब ठेवले न जाणे या सर्व बाबींविषयीची माहिती संदिग्ध, अपुरी, दिशाभूल करणारी दिली जाते किंवा मूळ मुद्दा बाजूला ठेवून वेगळेच उत्तर दिले जाते, असा अपीलकर्त्याचा आक्षेप आहे. तो रास्त आहे. त्याबाबत नेमकेपणा पडताळणे आवश्यक आहे. म्हणून याबाबत शिक्षण संचालकांनी चौकशी दि. ३० जुलै २००७ पर्यंत करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

४. अपील क्र.११४ मध्ये माहिती देण्यास झालेल्या ७ दिवसांच्या विलंबाबद्दल रु.१७५०/- शास्ती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना लावण्यात येत आहे.

५. मुख्याध्यापकांनी केलेली विनंती मान्य करुनही माहिती देण्याबाबत झालेली टाळाटाळ, अपुरी माहिती देणे वा माहिती न देणे याची दखल घ्यावी लागेल. प्रत्येक विषयाचा स्वतंत्रपणे व सर्व विषयांचा एकत्रितपणे विचार केल्यानंतर सिध्द होणा-या या अपराधाबद्दल माहिती अधिकारी श्री. ढोले यांना रुपये ५०००/- शास्ती लावण्यात येत आहे.

६. वरील दोनही शास्तीची रक्कम तीन हप्त्यात (माहे जुलै २००७ च्या वेतनापर्यंत ) कापून घ्यावी. शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली ती जमा करावी. याची पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, सांगली यांची राहील.

७. अपीलकर्त्याची नुकसान भरपाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

**ठिकाण :- पुणे.**
**दिनांक :- १९ / ५ /२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**